LOKSATTA, Thane, 4.10.2024
Page No. 5, Size:(9.56)cms X (8.53)cms.

**Speeding up work on undersea bullet train tunnel**

# समुद्राखालून जाणाऱ्या बुलेट ट्रेनच्या बोगद्याच्या कामाला गती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम हाती घेतले आहे. या मार्गातील मुख्य आकर्षणाचा भाग म्हणजे २१ किलोमीटर लांबीचा वांद्रे-कुर्ला संकुल-शिळफाटा या समुद्राखालून जाणाऱ्या या बोगद्याचे काम वेगाने सुरू आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गिका ५०८ किमी लांबीची असून सुरुवातीचे वांद्रे-कुर्ला संकुल स्थानक भूमिगत आहे. वांद्रे-कुर्ला संकुल- शिळफाट्यापर्यंत २१ किमी लांबीच्या बोगद्यापैकी सात किलोमीटर लांबीचा देशातील पहिला समुद्राखालील बोगदा ठाणे खाडी खालून जाणार आहे.

बुलेट ट्रेनच्या अप आणि डाऊन मार्गांसाठी एकच खोदण्यात येणार आहे. बोगद्यासाठी १३.१ मीटर व्यासाच्या 'कटर हेड टीबीएम' महाकाय यंत्राचा वापर केला जाणार आहे.

बोगद्याच्या २१ किमीपैकी १६ किमी भागासाठी तीन टनेल बोअरिंग यंत्रांचा वापर केला जाणार असून उर्वरित ५ किमीच्या भागासाठी 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग' (बोगदा खोदकाम) पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

हा बोगदा जमिनीपासून सुमारे २५ ते ६५ मीटर खोल असणार आहे. त्याचा सर्वात खोल भाग शिळफाटाजवळ पारसिक डोंगराच्या खाली ११४ मीटर जमिनीखाली असेल.

वांद्रे-कुर्ला संकुल, विक्रोळी आणि सावळीमध्ये अनुक्रमे ३६ मीटर, ५६ मीटर आणि ३९ मीटर खोलीवर तीन यांत्रिक उपकरणे (शाफ्ट) सोडण्यात येणार आहेत. विक्रोळीत ९२ टक्के बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले आहे. तर, सावली येथे १०० टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे.

या वर्षाच्या अखेरीस पहिले 'टनेल बोरिंग यंत्र' जमिनीखाली जाण्यास सज्ज होईल. खोदकाम आणि बोगद्यात सुरू असलेल्या कामांमुळे सभोवतालच्या वास्तूंना कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी अत्याधुनिक उपकरणाचा वापर करण्यात येणार आहे, अशी माहिती 'नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

LOKSATTA, PALGHAR, 4.10.2024
Page No. 1, Size:(15.74)cms X (6.92)cms.

**Construction of Vaitrana Khadi bridge for bullet train is underway**

# बुलेट ट्रेनसाठी वैतरणा खाडीपुलाच्या उभारणीचे काम सुरू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मुंबई-बडोदा बुलेट ट्रेनसाठी पालघर जिल्ह्यातील वैतरणा खाडीवर सुमारे दोन किलोमीटर लांबीचा पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीच्या कामासाठी खाडीवर एका तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे. मुख्य पुलाच्या निर्मितीसाठी साहित्य, अवजड वाहनांची ये-जा करण्यासाठी या पुलाचा उपयोग होणार आहे.

५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जातो. जिल्ह्यात वैतरणा खाडीवर त्यासाठी २.३२ किलोमीटर लांबीचा पूल बांधण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीसाठी साधनसामुग्री, वाहने आणि इतर कामांसाठी जागेची आवश्यकता आहे. यासाठी खाडीवर प्रस्तावित पुलाच्या समांतर तात्पुरता पुल उभारण्याचे काम सुरू झाले आहे. या तात्पुरत्या पुलाची लांबी देखील प्रस्तावित पुलाएवढीच असणार आहे. हा तात्पुरता पुल तयार झाल्यानंतर मुख्य पुलाचे काम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एनएचएसआरसीएल) जनसंपर्क विभागाकडून देण्यात आली आहे. मुख्य पुलाच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. हा पूल विरार आणि बोईसर बुलेट ट्रेन स्थानकामध्ये असणार आहे. त्यात ५९ पिलर आणि प्रत्येकी ४० मीटरचे ५८ स्पॅन असणार आहेत. याची लांबी २.३२ किलोमीटर एवढी असून तो बुलेट प्रकल्पातील सर्वात मोठा पूल ठरणार आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी कास्टिंग यार्डमध्ये एक हजार फुल स्पॅन बॉक्स गर्डर निर्मितीचे काम पूर्ण झाले असून बुलेट ट्रेनचे गुजरात राज्यातील बडोदा आणि वापी येथील समर्पित कास्टिंग यार्डमध्ये पूर्ण होत आहे.



## बुलेट ट्रेन अशी...

ही बुलेट ट्रेन वसई तालुक्यातील २१ आणि वसई, विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील १४ गावातून जाणार आहे. वसईतून तो एकूण २६.५ किलोमीटर लांबीचा आहे. या बुलेट ट्रेनसाठी गुजरातमध्ये आठ आणि महाराष्ट्रात चार अशा एकूण १२ स्थानके बांधण्यात येणार आहेत. त्यात महाराष्ट्रातील वांद्रे-कुर्ला संकुल, ठाणे, विरार, बोईसर आणि गुजराथ मधील वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, बडोदे, आनंद, अहमदाबाद आणि साबरमती या स्थानकांचा समावेश आहे.

LOKSATTA, Mumbai, 4.10.2024
Page No. 3, Size:(3.47)cms X (10.35)cms.

**Bridge work over Vaitarna creek for bullet train**

# बुलेट ट्रेनसाठी वैतरणा खाडीवर पुलाचे काम

**वसई :** मुंबई-बडोदा बुलेट ट्रेनसाठी पालघर जिल्ह्यातील वैतरणा खाडीवर सुमारे दोन किलोमीटर लांबीचा पूल उभारण्यात येणार आहे. या पुलाच्या निर्मितीच्या कामासाठी खाडीवर एका तात्पुरत्या पुलाच्या उभारणीचे काम सुरू करण्यात आले आहे. मुख्य पुलाच्या निर्मितीसाठी साहित्य, अवजड वाहनांची ये-जा करण्यासाठी या पुलाचा उपयोग होणार आहे.

मुंबई-अहमदाबाद या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचे प्रगतीपथावर आहे. या बुलेट ट्रेनचा मार्ग पालघर जिल्ह्यातून जातो. जिल्ह्यात वैतरणा खाडीवर त्यासाठी २.३२ कि.मी. लांबीचा पूल बांधणार आहे. या पूलाच्या निर्मितीसाठी साधनसामुग्री, वाहने आणि इतर कामांसाठी जागेची आवश्यकता आहे. यासाठी खाडीवर प्रस्तावित पुलाला समांतर तात्पुरता पूल उभारण्याचे काम सुरू झाले आहे.

LOKSATTA, Mumbai, 4.10.2024
Page No. 1, Size:(6.26)cms X (5.94)cms.

**Bullet train tunnel work speed up**

# बुलेट ट्रेनच्या बोगद्याच्या कामाला गती

**मुंबई :** 'नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ने मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम हाती घेतले आहे. या मार्गातील मुख्य आकर्षणाचा भाग म्हणजे २१ किलोमीटर लांबीचा वांद्रे-कुर्ला संकुल-शिळफाटा या समुद्राखालून जाणाऱ्या या बोगद्याचे काम वेगाने सुरू आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गिका ५०८ किमी लांबीची असून सुरुवातीचे वांद्रे-कुर्ला संकुल स्थानक भूमिगत आहे. वांद्रे-कुर्ला संकुल- शिळफाट्यापर्यंत २१ किमी लांबीच्या बोगद्यापैकी सात किलोमीटर लांबीचा देशातील पहिला समुद्राखालील बोगदा ठाणे खाडी खालून जाणार आहे.

बुलेट ट्रेनच्या अप आणि डाऊन मार्गासाठी एकच खोदण्यात येणार आहे. बोगद्यासाठी १३.१ मीटर व्यासाच्या 'कटर हेड टीबीएम' महाकाय यंत्राचा वापर केला जाणार आहे.

**Bullet Train Project Works in Palghar Construction**

# बुलेट ट्रेन प्रकल्पाची पालघरमधील कामे सुसाट

राज्यातील २१किमी लांबीच्या बोगदा निर्मितीचे काम सुरू; ७किमी लांब बोगद्याचे समुद्राखालून बांधकाम



**गुजरात राज्यात २१० मीटर लांबीच्या पुलाचे काम पूर्ण**